बातमी तुमची-आमची

# मावळ ONLINE

■ तळेगाव दाभाडे (मावळ) ■ बुधवार, दि. 9 जुलै 2025 ■ पाने - 12 ■ खाजगी वितरणासाठी

# स्व. कृष्णराव भेगडे श्रद्धांजली विशेषांक



मावळ तालुक्याच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व औद्योगिक क्षेत्रात भरीव योगदान देणारे, हजारो जणांच्या जीवनात दीपस्तंभासारखे प्रकाश टाकणारे मावळभूषण, शिक्षणमहर्षी आणि माजी आमदार कै. कृष्णराव भेगडे (वय ८९) यांचे सोमवार, दि ३० जून २०२५ रोजी रात्री नऊ वाजता निधन झाले. त्यांच्या जाण्याने मावळने एक खंबीर आधारवड गमावला आहे.



## एक ध्येयवादी प्रवास

### कृष्णराव भेगडे यांचे जीवनदर्शन

### बालपण आणि प्राथमिक शिक्षणाची पायाभरणी

मावळ-मुळशीच्या परिसरात 'भेगडे' हे नाव उच्चारलं की डोळ्यासमोर येते एक कर्तृत्वाची, जिद्दीची आणि समाजाभिमुख सेवाभावाची प्रतिमा. शिक्षण, सहकार, राजकारण, समाजकारण आणि कार्यकर्त्यांच्या घडणीचा गाभा असलेले ज्येष्ठ नेते माजी आमदार कृष्णराव भेगडे यांचे जीवन म्हणजे एक प्रेरणादायी दस्तावेजच होय.

त्यांचा जीवनप्रवास अगदी सामान्य घरातला, पण स्वप्न मात्र असामान्य होती. तळेगाव नगरपरिषदेच्या शाळा क्र. १ मध्ये त्यांनी शिक्षणाला सुरुवात केली. पुढे नूतन विद्या मंदिर, ज्याचे आजचे नाव ॲड पु. वा. परांजपे विद्या मंदिर आहे, तिथून त्यांनी पाचवी ते नववीचे शिक्षण पूर्ण केले.

या काळात त्यांचे अनेक शिक्षक - निंबळे गुरुजी, कुडे गुरुजी, गणपत साबणे, भराडी गुरुजी आणि विशेषतः भालचंद्र बारमुख यांचं मार्गदर्शन लाभलं. त्यांनी शाळेत शिस्तबद्ध जीवनशैली शिकवली.

त्यांच्या बोलण्यात, हावभावांत आणि वर्तनात शालेय वयातच नेतृत्वगुण स्पष्ट दिसत होते. हस्ताक्षर इतकं वळणदार होतं की सूचना फलकांवरचे लेखन, शालेय नोटिस लिहिण्याची जबाबदारी त्यांच्यावर असायची. वक्तृत्व स्पर्धांमध्ये भाग घेणे, निबंध स्पर्धा, कबड्डीमध्ये सहभाग — त्यांनी सर्वच क्षेत्रात समरस होऊन सहभाग घेतला.

### राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रभाव

स्वातंत्र्य चळवळीचा काळ सुरु होता. राष्ट्रभक्ती आणि सामाजिक जाण याच काळात त्यांच्या मनात रुजली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शाखा ही त्यांच्यासाठी केवळ व्यायामशाळा नव्हे, तर मानसिक-चारित्र्य घडणीचं विद्यापीठ ठरली. संघशाखेत शिस्त, बौद्धिक विचार, संचलने, सण, परंपरा आणि सांघिकतेचे धडे त्यांना मिळाले. त्याच काळात संघाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आणि विचारप्रवाहाला योग्य दिशा दिली.

**प्रभाकर तुमकर**
(संपादक, मावळ ऑनलाईन)

### महाविद्यालयीन शिक्षण आणि वैचारिक घडण

माध्यमिक शिक्षण पूर्ण करत असतानाच त्यांच्या आजूबाजूला शिक्षण क्षेत्रात झपाटून काम करणाऱ्या अनेक दिग्गजांशी त्यांचा संपर्क आला. रमणभाई शहा, पु.वा. परांजपे, काका खळदे यांच्यासारख्या अभ्यासू व जागृत विचारांच्या व्यक्तींनी त्यांच्यावर प्रभाव टाकला.

(पान 2 वर)



सेवा परमो धर्म म्हणून सेवेला महत्त्व देणारी आपली संस्कृती आहे. जसे बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे थापा होते, शरद पवार यांच्याकडे गामा आहेत तसेच कृष्णराव भेगडे यांची निस्सीम सेवा करणारे दामुमामा चोरघे यांचेही स्थान भेगडे साहेबांच्या आयुष्यामध्ये अनन्यसाधारण असे म्हणता येईल. गेल्या चार दशकांहून अधिक, एक व्रत म्हणून भेगडे साहेबांची सेवा करणारे दामु चोरघे यांनी साहेबांच्या आठवणींना उजाळा दिला......

**मावळ भूषण, शिक्षण महर्षी दिवंगत माजी आमदार**

## स्व. कृष्णरावजी भेगडे साहेब

**यांना मावळ ऑनलाईन परिवाराच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली**

बातमी तुमची-आमची
मावळ ONLINE

# एक ध्येयवादी प्रवास

## कृष्णराव भेगडे यांचे जीवनदर्शन

(पान 1 वरुन)

पुण्यातील मॉडर्न हायस्कूल आणि पुढे फर्ग्युसन कॉलेज येथे त्यांचे महाविद्यालयीन जीवन घडले. त्यांनी अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र या विषयांत विशेष गती दाखवली. बी.ए. ऑनर्स ही पदवी त्यांनी मिळवली आणि बहुजन समाजातून पदवीधर होणारे पहिले व्यक्ती ठरले. शिक्षणात पुढे जायचं हे ध्येय त्यांनी उराशी बाळगलं होतं. नंतर लॉ कॉलेज मधून त्यांनी विधी शिक्षणही घेतले.

### नोकरीचा अनुभव आणि सार्वजनिक कार्याची ओढ

आवड ही सार्वजनिक कामाची. त्यामुळे सरकारी नोकरीत त्यांचे मन रमत नव्हते. काही काळ त्यांनी शिक्षक, सहकार खात्यातील अधिकारी आणि मंचरमधील नोकरी केली. पण प्रत्येक वेळी सार्वजनिक कामासाठी मन अस्वस्थ होत राहायचं.

१९६१ च्या विधानसभेच्या निवडणुकीत श्री. नथुभाऊ पाटील यांच्या प्रचारासाठी त्यांनी स्वतःला झोकून दिलं. वेळेचा अभाव, नोकरीतील असमाधान आणि सार्वजनिक कामाची ओढ — या साऱ्यांचा परिणाम असा झाला की त्यांनी नोकरी सोडली. मग कांचनभाई शहा यांच्या मार्गदर्शनाखाली पिठाची गिरणी सुरु केली, ज्यामुळे अर्थार्जनाचा प्रश्न मार्गी लागला आणि ते पूर्णवेळ पक्ष कार्यात उतरले.

### जनसंघाच्या माध्यमातून ग्रामीण भागात कार्य

संघ आणि जनसंघाच्या माध्यमातून त्यांनी मावळ तालुक्यात डोंगरी आणि आदिवासी भागातील जनतेशी थेट संपर्क साधला. त्यांच्या प्रश्नांची नोंद ठेवली. शिक्षण, आरोग्य आणि स्वावलंबन हे तीन मुद्दे त्यांच्या कार्याच्या केंद्रस्थानी होते.

१९५७ मधील संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत तरुण कृष्णरावांचा सहभाग उल्लेखनीय होता. श्री. रामभाऊ म्हाळगी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शिस्त, स्वावलंबन आणि कार्यपद्धती शिकली. रामभाऊ यांच्या कार्यपद्धतीने त्यांना सार्वजनिक जीवनाची मूलभूत तत्त्वे शिकवली — व्यक्ती नव्हे, पक्ष मोठा असतो ही शिकवण त्यांनी मनावर कोरून घेतली.

### स्थानीय राजकारणाची सुरुवात

१९६२ साली शालिनीताईंशी विवाह झाला. त्याच वर्षी तळेगाव नगरपालिकेची निवडणूक लढवून ते निवडून आले. त्या वेळी तळेगाव नगरपालिका आर्थिक दृष्ट्या अत्यंत मर्यादित होती. त्यांनी इंद्रायणी नदीच्या पाण्यावर आधारित जलपुरवठा योजना सुरु केली. नगरपालिका कार्यालयाची इमारत उभी राहिली. पायाभूत सुविधांच्या उभारणीत त्यांनी मोलाचं योगदान दिलं.

याच काळात नानासाहेब परुळेकरांनी पुणे जिल्ह्यातील नगरपालिकांची संघटना स्थापन केली आणि त्याचे कार्यवाह म्हणून कृष्णराव यांची निवड केली गेली. ही निवड म्हणजे त्यांच्या कार्याची राज्यस्तरीय पावती होती.

### सहकार क्षेत्रातील योगदान

सहकार क्षेत्रात त्यांनी तळेगाव विविध कार्यकारी विकास सहकारी संस्था, सुपरवायझिंग युनियन, कृषी उत्पन्न बाजार समिती, सेलर गिरणी, खरेदी-विक्री संघ आदींची स्थापना करून बहुजन समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी कार्य केलं.

### शिक्षण क्षेत्रातील संघर्ष आणि यश

शिक्षण क्षेत्रातही त्यांनी क्रांती घडवली. तळेगाव व लोणावळा परिसरात असणाऱ्या शिक्षण संस्थांची धुरा स्थानिक लोकांच्या हातात यावी यासाठी त्यांनी संघर्ष केला. इंद्रायणी महाविद्यालय आर्थिक अडचणीत असताना रामकृष्ण मोरे, बाळासाहेब किबे, दादासाहेब ढोरे यांच्यासह त्यांनी संस्थेला सावरण्यासाठी प्रयत्न केले. लोणावळ्यातील आय.टी.आय. संस्थेची उभारणी ही तर त्यांनी केलेल्या प्रयत्नांची शिखर घटना होती.

### विधानसभा निवडणूक आणि आमदारकी

१९६७ च्या विधानसभा निवडणुकीत



त्यांनी जनसंघाकडून मावळ मतदारसंघातून उमेदवारी मिळवली. मतमोजणीच्या अंतिम क्षणापर्यंत पुढे असतानाही श्री. रघुनाथराव सातकर यांच्या एका भागातील मतपेटीने निकाल उलटला आणि त्यांचा पराभव झाला. तरीही त्यांनी लोकांना एक सकारात्मक संदेश दिला — हे व्यक्तीचे नव्हे, पण १९७२ मध्ये त्यांनी पुन्हा निवडणूक लढवली आणि साडेबारा हजार मतांनी विजय मिळवून आमदारकी मिळवली. मावळ तालुक्यात आनंदाचा जल्लोष

(पान 7 वर)



मावळ ऑनलाईन चा हा विशेषांक **पुणे इन्फो मीडिया** करिता **संस्थापक-संचालक विवेक विजयकुमार इनामदार** यांनी सकाळ प्रिंटिंग प्रेस, वडकी पुणे ४१२ ३०८ येथे छापून संकल्प, १६ अ, राव कॉलनी तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे येथे खाजगी वितरणासाठी प्रसिद्ध केला. **संपादक - प्रभाकर तुमकर**
मोबाईल नं.- 98224 03768 ई-मेल : puneinfomedia24@gmail.com

बातमी तुमची-आमची
मावळ ONLINE

# शिक्षणाचा दीप, समाजसेवेचा प्रकाश - एक आठवणीतला भावनिक प्रवास



आदिवासी आंदोलन



शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नाही, तर ते जीवन जगण्याचे खरे साधन आहे. शिक्षक म्हणून माजी आमदार कृष्णराव भेगडे यांचा प्रवास सुरु झाला, पण शिक्षणाची गोडी त्यांच्या मनात इतकी खोल रुजली की, ती समाजाच्या उन्नतीसाठी झगडण्याचं कारण ठरली.

**रामदास काकडे**
(अध्यक्ष, इंद्रायणी विद्या मंदिर)

## जमिनीसाठीचा आदिवासी लढा

नक्षलवाद वाढू नये समाज एकत्र रहावा हा विचार १९७२ साली मांडणारे ते नेते होते. वडगाव येथे भेगडे साहेबांनी एक ऐतिहासिक लढा दिला. ठाकर, कातकरी, आदिवासी बांधवांसाठी जमीन मिळावी, त्यांचे हक्क राखले जावेत, यासाठी जवळपास दहा हजार बांधवांना घेऊन आंदोलन केले. त्यावेळी त्यांना एक महिना अटक झाली, पण त्यातून महाराष्ट्रात एक नवा कायदा तयार झाला. त्यावेळी ते फक्त शिक्षक वा आमदार नव्हते, तर समाजासाठी झगडणारा एक कार्यकर्ता होते.

## वसंतदादा पाटील यांना साहेबांनी पाठवलेले पत्र आणि दूरदृष्टी

एका दिवसाची आठवण अजूनही माझ्या मनात ताजी आहे – वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना त्यांना भेगडे साहेबांनी पाठवलेले त्यांचं एक जुने पत्र अचानक माझ्या हातात आलं. त्या पत्रात त्यांनी पुणे मुंबई अजून एक महामार्ग व्हावा तसेच नाशिक - चाकण - पाईट - कर्जत - मुंबई असा तिसरा राष्ट्रीय महामार्ग व्हावा, असे स्पष्टपणे सुचवले होते. धरणांची उभारणी वाढावी, आणि आपले उद्योग परराज्यात जाऊ नयेत व महाराष्ट्रात टिकावेत यासाठी इंजीनियरिंग कॉलेज व्हावीत याकरिता वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना त्यांना पत्र लिहिले. एक दिवस घर बदलत असताना ते पत्र माझ्या हातात लागले त्यातून त्यांची दूरदृष्टी जाणवते. पुढे 2000 साली पुणे- मुंबई द्रुतगती मार्ग झाला. तो करताना देखील भेगडे साहेबांनी महत्त्वाची भूमिका बजावली. गडकरी साहेब अजूनही त्याचा उल्लेख करतात.

## शिक्षणासाठी केलेला संप

१९८० साली, मी कॉलेजमध्ये शिकत होतो, इंद्रायणी महाविद्यालय चालू राहावे यासाठी आम्ही कॉलेज बंद आंदोलन केलं. मुलींच्या शिक्षणाचा मुद्दा त्या आंदोलनामागे होता. त्या वेळी आम्हाला अनेकांनी विरोध केला, पण आज जेव्हा हजारो मुली शिक्षण घेऊन स्वतंत्र उभ्या आहेत, तेव्हा त्या संघर्षाचे मोल कळते.

## इंद्रायणी विद्या मंदिर आणि आर्थिक संकट

संस्थेवर महाराष्ट्र बँकेचे दहा लाख रुपयांचे कर्ज होते. त्यावेळी प्रा. रामकृष्ण मोरे यांना अध्यक्ष करून ते कर्ज फेडले. त्यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी दहा लाख रुपये दिले. आणि वसंतदादा पाटील यांनी स्वतः पुढाकार घेऊन संस्थेच्या कर्जमुक्तीसाठी मदत केली. त्या निर्णयामुळे इंद्रायणी महाविद्यालय पुन्हा उभं राहिलं. ही एक दूरदृष्टी भेगडे साहेबांची होती, जी आज शेकडो विद्यार्थ्यांच्या भविष्याचा आधार बनली.

## शिक्षणासाठी जमिनीचा त्याग

पिंपरी-चिंचवड पॉलिटेक्निकसाठी शरद पवार साहेबांकडून परवानगी मिळवली. कै भेगडे साहेबांनी स्वतःच्या नावावरील आणि नंदकुमार शेलार यांच्या नावावरील २५ एकर जमीन संस्थेस दिली – एकही पैसा न घेता. पिंपरी-चिंचवड इंजिनिअरिंग कॉलेजही याच जमिनीवर उभं राहिलं. हजारो विद्यार्थ्यांसाठी ही जमीन शिक्षणाचे केंद्र बनली, हीच त्यांची खरी संपत्ती आहे.

## कुटुंबाचा त्याग आणि शिक्षणासाठी एफडी

नूतन महाराष्ट्र इंजिनिअरिंग कॉलेजसाठी परवानगी मिळवताना भेगडे साहेबांनी स्वतःच्या व पत्नी शालिनीताई यांच्या नावावरील रक्कमेच्या एफडी मोडल्या व रक्कम कॉलेजच्या खात्यावर ठेवली त्यातून एआयसीटी कडून परवानगी मिळाली. त्या त्यागामुळे हजारो विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची दारे खुली झाली.

## कॅन्सर हॉस्पिटल आणि वैद्यकीय महाविद्यालय

मावळ तालुक्यातील नागरिकांना अद्यावत सुविधा (आरोग्य) मिळाव्यात यासाठी भेगडे साहेबांनी एमआयटी या संस्थेबरोबर संयुक्तपणे सन १९९५ मध्ये वैद्यकीय महाविद्यालय उभं केलं. हे केवळ शिक्षणाचं नव्हतं, तर आरोग्याचंही दालन होतं. त्यामार्फत तालुक्यातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षण घेता यावे हाही उद्देश होता तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोफत अल्प दरात आरोग्य सेवा मिळावी असा मानसही होता. ग्रामीण भागातील मुलींना नर्सिंग चे शिक्षण मिळावे यासाठी सन २००० मध्ये त्यांनी नर्सिंग कॉलेज सुरु केले आणि मुलींना स्वतःच्या पायावर उभे केले. त्याचबरोबर या संस्थेचा विस्तार कॅन्सर हॉस्पिटलपर्यंत झाला. ही केवळ एक सुविधा नव्हे, तर हजारो रुग्णांसाठी आशेचा किरण आहे.

## संत तुकाराम साखर कारखाना – एक चळवळ

एक हजार रुपयांचे शेअर्स प्रत्येक शेतकऱ्यांच्या घरी जाऊन नानासाहेब नवले, मुकुंदराव खळदे, दादासाहेब ढोरे, ज्ञानेश्वर लांडगे, साहेब,अशोक अण्णा मोहोळ आणि इतर सहकाऱ्यांनी जमा केले. आज त्या कारखान्यामुळे हजारो शेतकऱ्यांच्या हाताला काम मिळालं आहे. ही एक लोकचळवळ होती.

## ULC कायदा आणि तळेगाव पॅटर्न

कमाल जमीन धारणा कायदा (ULC Act) आला तेव्हा अनेकांना धास्ती वाटली. पण त्याच काळात 'तळेगाव पॅटर्न' म्हणून ओळखला जाणारा "सिलिंग ट्वेंटी २०" कायदा साहेबांनी राबवला. गोरगरीबांना घरे मिळावी म्हणून भेगडे साहेब, बाफना साहेब यांनी खूप परिश्रम घेतले. त्यामुळे गरीब जनतेला प्लॉट विकत घेणे जमले.

## वीज सवलती आणि पाणी

ग्रामपंचायत, नगरपरिषद आणि महानगरपालिकांना पाणीपुरवठा व वीजबिलावर मोठा खर्च व्हायचा. त्यांनी कायद्यात बदल करून सवलतीच्या दराने वीज मिळवून दिली. त्यामुळे पाणी व वीज या मूलभूत गरजा भागल्या.

## तळेगाव MIDC – रोजगाराचं स्वप्न

तळेगाव MIDC साकारताना साहेबांनी कामगार, कला, उद्योग या क्षेत्रांत काम केलं. औद्योगिकीकरणामुळे हजारो युवकांना रोजगार मिळाला. पायाभूत सुविधा वाढल्या आणि या भागाचा चेहरामोहराच बदलला. आज तळेगाव मध्ये ह्युंडाई, जेसीबी, लार्सन अँड टुब्रो, पॉस्को टीएमसी इंडिया, इना बेअरिंग्स, शेफलर इंडिया, सिकाउत्क्सो इंडिया, एमर्सन यासह अनेक उद्योग उभे राहिले आहेत.

## एकत्रित कुटुंबासाठी लढा

भेगडे साहेबांनी फक्त शाळा उभारल्या नाहीत, तर कुटुंबं उभी केलीत. भांडणं मिटवणं, कुटुंब एकत्र ठेवणं, समाजात ऐक्य निर्माण करणं हेही त्यांनी कर्तव्य मानलं.

आज मागे वळून पाहताना वाटतं – शिक्षण, आरोग्य, उद्योग, पाणी, वीज, घरे, साखर कारखाना, एमआयडीसी – या सर्व क्षेत्रांत साहेबांनी जे काही केलं, ते केवळ समाजासाठी होतं. ते एक समाजाचा घटक आहेत, आणि घटक म्हणूनच हे सारे लढे त्यांनी दिले. शेवटी साहेबांनी शिक्षण हेच खरं जीवन मानले, आणि समाजसेवा हाच त्यांचा श्वास! ■ ■ ■

RMK Infrastructure Pvt. Ltd.
मावळ तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आयुष्य वेचणारे समर्पित नेते स्व. कृष्णराव भेगडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

# मावळ भूषण कै. कृष्णराव भेगडे यांना विविध क्षेत्रातील मान्यवरांची भावपूर्ण श्रद्धांजली

## नूतन महाराष्ट्र शिक्षण संस्थेच्या प्रांगणात शोकसभा; प्रेरणादायी विचारांना स्मरण







मावळ भूषण, शिक्षणमहर्षी, आणि माजी आमदार कै. कृष्णराव भेगडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळाच्या इंजिनिअरिंग कॉलेज सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या शोकसभेत, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत त्यांच्या बहुआयामी कार्याचा गौरव केला.

शोकसभेला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "कै. भेगडे साहेबांनी त्यांच्या ५२ वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत विधायक व समाजोपयोगी कामांना सर्वोच्च प्राधान्य दिले. त्यांनी पारदर्शक कारभार केला आणि अनेक सरकारी योजना गोरगरीबांपर्यंत पोहचवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले."

इंद्रायणी विद्या मंदिर संस्थेचे अध्यक्ष रामदास काकडे म्हणाले, "साहेब हे केवळ व्यक्ती नव्हते, तर एक विद्यापीठ होते. त्यांच्या विचारांचा वारसा पुढच्या पिढीला प्रेरणा देण्यासाठी त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याची उभारणी नूतन शिक्षण संस्थेच्या प्रांगणात करण्यात येणार आहे."

नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळाचे सचिव संतोष खांडगे यांनी भावुक होऊन सांगितले, "भेगडे साहेब आमच्या कुटुंबाचे आणि संपूर्ण संस्थेचे आधारवड होते. त्यांच्या ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्वामुळे आज आम्ही या संस्थेत काम करत आहोत. साहेबांच्या आठवणींनी अंतःकरण भरून येत आहे."

प्रमुख समाजसेवक भास्करराव म्हाळसकर यांनी "मावळचा स्वयंप्रकाशित तारा हरपला" अशा शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या.

राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष गणेश खांडगे म्हणाले, "भेगडे साहेब हे सर्वस्पर्शी, अष्टपैलू आणि ठाम मतांचे नेते होते. त्यांचा शब्द अंतिम मानला जायचा, आज मात्र तो अंतिम शब्द हरपल्याचे दुःख आहे."

साप्ताहिक अंबर चे संपादक सुरेश साखवळकर यांनी भेगडे साहेबांचे राजकारण "व्यापक आणि वैचारिक मूल्यांना प्रेरणा देणारे" असल्याचे सांगत, नव्या पिढीने त्यांच्या विचारांचा आदर्श घ्यावा, असे मत मांडले.

इंद्रायणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संभाजी मलघे यांनी, "संस्थेचा खंबीर आधारवड हरपल्याने इंद्रायणी कुटुंब पोरकं झालं आहे," असे दुःखपूर्वक सांगितले.

या प्रसंगी डॉ. डी. एम. डोमकुंडवार, गिरीश देसाई, रमेश जांभुळकर, आयुब शिकीलकर, माजी नगराध्यक्ष सुरेश चौधरी, प्रा. मगन ताटे, संत तुकाराम साखर कारखान्याचे संचालक ज्ञानेश नवले, डॉ. दीपक शहा, डॉ. अनंत परांजपे, प्रकाश ओसवाल, लक्ष्मण भालेराव, सुनील भोंगाडे, रवीना व रिद्धी म्हस्के, यादवेंद्र खळदे, श्रीकृष्ण मुळे आदी मान्यवरांनीही आपल्या शब्दांत श्रद्धांजली वाहिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विनया केसकर यांनी केले, तर ऋणनिर्देश रवींद्र आप्पा भेगडे यांनी केला.

कै. कृष्णराव भेगडे यांच्या जाण्याने मावळ तालुक्याने केवळ एक नेता नव्हे, तर शिक्षण, समाजसेवा आणि नेतृत्वाचा प्रकाशझोत गमावला आहे. त्यांच्या कार्याचा ठसा पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील, याबाबत एकमताने श्रद्धांजली सभेतून जाणवले.

■ ■ ■



बातमी तुमची-आमची
मावळ ONLINE

# भावपूर्ण श्रद्धांजली...



कळविण्यास अत्यंत दु:ख होते की,

## इंद्रायणी विद्या मंदिर

या शैक्षणिक संकुलाचे माजी अध्यक्ष, विधानसभेचे माजी आमदार, मावळभूषण, शिक्षण महर्षी

## कै. श्री. कृष्णरावजी भेगडे साहेब (वय ८९)

यांचे सोमवार दि. ३० जून २०२५ रोजी दु:खद निधन झाले. ईश्वरी सत्तेपुढे इलाज नाही!
त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना!

**|| दशक्रिया / माळेचा विधी ||**

बुधवार दि. ०९/०७/२०२५ रोजी सकाळी ९ वाजता
स्थळ : श्री बनेश्वर दशक्रिया विधीभूमी, तळेगाव दाभाडे

**❊ शोकाकुल ❊**

श्री. रामदासजी काकडे – अध्यक्ष
श्री. गोरखनाथ काळोखे – उपाध्यक्ष
श्री. दीपक शहा – उपाध्यक्ष
श्री. चंद्रकांत शेटे – सचिव
श्री. शैलेश शहा – खजिनदार

श्री. गणेश खांडगे, श्री. विलास काळोखे, श्री. संदिप काकडे, सौ. निरुपा कानिटकर, श्री. संजय साने, श्री. युवराज काकडे, श्री. रणजित काकडे

डॉ. संभाजी मलघे (प्राचार्य), डॉ. संजय आरोटे (प्राचार्य, बी. फार्मसी), प्रा. एस. एन. पाटील (प्राचार्य, इंजिनिअरिंग)

**व सर्व आजी माजी पदाधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी वर्ग**

## इंद्रायणी विद्या मंदिर, तळेगाव दाभाडे

तळेगाव चाकण रोड, तळेगाव दाभाडे (स्टेशन), ता. मावळ, जि. पुणे, मो. ८३०८४१९६१०

### यशोदा महादेव काकडे कॉलेज ऑफ इंजिनियरिंग

❊ इंद्रायणी महाविद्यालय (कला, वाणिज्य, विज्ञान, बी.बी.ए. व बी.सी.ए., एम.ए. व एम.कॉम.)
❊ इंद्रायणी कनिष्ठ महाविद्यालय (कला, वाणिज्य, विज्ञान व तंत्रशिक्षण)
❊ कृष्णराव भेगडे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्यूटिकल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च (बी.फार्मसी)
❊ इंद्रायणी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी (डी. फार्म.)
❊ श्री. कांतीलाल शहा विद्यालय (इंग्रजी माध्यम), तळेगाव दाभाडे
❊ श्रीराम विद्यालय (माध्यमिक विभाग), नवलाख उंब्रे
❊ श्री संत तुकाराम विद्यालय (माध्यमिक विभाग), शिवणे
❊ इंद्रायणी इंग्लिश मीडियम स्कूल – नवलाख उंब्रे
❊ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे मान्यताप्राप्त शैक्षणिक केंद्र
❊ इंद्रायणी करिअर गाईड ॲन्ड रिसर्च सेंटर (स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्र)
❊ स्कील डेव्हलपमेंट प्रोग्रॅम ❊ मुलींचे वस्तीगृह

बातमी तुमची-आमची
मावळ ONLINE

# भेगडे साहेबांचा जीवनपट दृष्टिक्षेपात...

परमेश्वरानं काही माणसांना त्यांच्या ललाटावर विनम्रतेचा आणि सौजन्याचा लेख लिहूनच जन्माला घातलेलं असतं. आयुष्यभर माणसांचा संग्रह करण्याचा ध्यास घेऊन जोडलेले कार्यकर्ते, त्यांच्या सहकार्यातून गोरगरिबांच्या आणि परिसराच्या विकासाचं स्वप्न पाहणारी माणसं आपल्या उत्तुंग कर्तृत्वानं आदर्श निर्माण करतात. कणाचीही अपेक्षा न ठेवता अत्यंत निस्वार्थी वृत्तीनं उभारलेल्या संस्था केवळ यशस्वीच होत नाहीत तर पुढच्या पिढीसाठी स्वाभिमानाचं बीज पेरतात. इतिहास प्रसिध्द मावळावर प्रसिध्द मावळावर अपार कष्टाचं, एकजुटीचं, निस्पृह निस्वार्थतेचं लखलखतं तोरण बांधणाऱ्या सौजन्यमूर्तीचं नाव आहे..... कृष्णराव भेगडे ......!



## कृष्णराव भेगडे व्यक्ति व कार्य

- जन्म : दि. १०-८-१९३६ रोजी तळेगांव येथे शेतकरी कुटुंबात जन्म.
- शिक्षण : बी.ए. (ऑनर्स)

## लोक प्रतिनिधीत्व

- १९६२ ते १९७२ या काळांत दोनवेळा तळेगांव दाभाडे नगरपरिषद नगरसेवकपदी निवड 'नगराध्यक्ष' म्हणून काम.
- १९७२ मध्ये जनसंघ पक्षाचे आमदार म्हणून महाराष्ट्राच्या विधानसभेवर निवड
- १९७८ मध्ये काँग्रेस पक्षाचे आमदार म्हणून महाराष्ट्राच्या विधानसभेवर फेरनिवड
- १९९२ साली पुणे स्थानिक स्वराज्य मतदार संघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर बिनविरोध निवड
- राज्याचे मुख्यमंत्री ना. शरदराव पवार यांचेसाठी आमदारपदाचा राजीनामा.
- १९९४ मध्ये महाराष्ट्र विधानसभा मतदार संघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेर निवड,

## सहकारी क्षेत्रातील काम

- तळेगांव (स्टे) वि.का.स. सोसायटीचे १० वर्षे चेअरमन म्हणून काम,
- मावळ तालुका सहकारी ख.वि. संघ व मावळ तालुका सह. देखरेख संघावर चेअरमन म्हणून काम.
- मावळ तालुका सह. कृषि उत्पन्न बाजार समितीच्या स्थापनेमध्ये पुढाकार.
- पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर मावळच्या सेवा सोसायटी मतदार संघातून दोन वेळा संचालक म्हणून निवड.
- मावळ, मुळशी, हवेली व खेड तालुका कार्यक्षेत्रांसाठी 'श्री संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याच्या 'स्थापनेत पुढाकार पहिली पाचवर्ष व्हाईस चेअरमन म्हणून काम,
- इंद्रायणी सहकारी औद्योगिक वसाहत, टाकवे बु., ता. मावळ या संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष.

## शिक्षण क्षेत्रातील काम

- सन १९६०-६१ माध्यमिक शिक्षक म्हणून नोकरी, पदाचा राजीनामा.
- 'न्यू इंग्लिश स्कूल' वडगांव या माध्यामिक शाळेची स्थापना करण्यात पुढाकर,
- नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ, तळेगांव या संस्थेवर चार वेळा गव्हर्निंग कौन्सिलवर निवड, संस्थेच्या खजिनदारपदी काम
- संस्थेच्या माध्यमातून पवना नगर, कान्हे, कार्ला येथील माध्यमिक शाळा सुरु करण्यात पुढाकार.
- इंद्रायणी विद्या मंदिर संस्थेवर गेली १२ वर्षे संस्थेचे 'कार्यवाह' म्हणून काम.
- इंद्रायणी महाविद्यालय व नवलाख उंब्रे व शिवणे येथील माध्यमिक शाळांचे यशस्वी संचालन

## आरोग्य क्षेत्रातील काम

- तळेगांव जनरल हॉस्पिटलच्या मॅनेजिंग कौन्सिलवर १९९३-९४ निवड. याच वर्षी संस्थेच्या अध्यक्षपदी निवड.
- तळेगांव जनरल हॉस्पिटलच्या माध्यमातून रुग्णसेवा परिणाम कारक करता यावी म्हणून मेडिकल कॉलेजच्या मंजूरीसाठी विशेष प्रयत्न.
- १९९४ साली माजी मुख्यमंत्री नामदार शरदराव पवार यांच्या पुढाकाराने तळेगांव मेडिकल कॉलेजला मंजूरी

## राजकीय वाटचाल

- १९५७ ते १९७६ पर्यन्त जनसंघ पक्षांत विविध पदांवरुन काम.
- १९७६ यशवंतराव चव्हाणांच्या उपस्थितीत काँग्रेस प्रवेश.
- जिल्हा काँग्रेसचे १९८४ ते १९९० या काळांत जिल्हा सरचिटणीस म्हणून काम.
- १९९० साली जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड, १९९२ साली पक्षान्तर्गत निवडणूकीमध्ये जिल्हाध्यक्ष म्हणून फेरनिवड व आजपर्यंत जिल्हा अध्यक्ष म्हणून काम.

या रुग्णालयाची सेवा देत असतांना शारिरीक व्याधीने त्रस्त, ज्यांच्याजवळ उपचारासाठी पैसा नाही, जे ग्रामीण व दुर्गम भागात राहतात, अशा गरीब व गरजू लोकांची एकच मागणी 'कृष्णराव' यांच्याकडे येते, अध्यक्ष साहेब, आमचे बिल माफ करा, आम्हाला मोफत उपचार द्या.

तोट्यात चालणाऱ्या हॉस्पिटलचा तोटा वाढवणारे निर्णय 'कृष्णराव' यांनी गोरगरिब जनतेच्या हितासाठी घेतले व घेत आहेत. या निर्णयाचे समाधान 'कृष्णराव' यांना मिळाले तरी हॉस्पिटलचे आर्थिक नुकसान 'अस्वस्थ' करीत होते. या अस्वस्थतेतूनच गोरगरिब जनतेच्या रुग्ण सेवेसाठी 'पंचविस लाख रुपये' 'सामाजिक कृतज्ञता निधी' म्हणून संकलित करुन बँकेत ठेवावे व त्या व्याजातून मोफत उपचाराचे निर्णय घेता यावेत. या निर्णय प्रक्रियेत स्थानिक समाजसेवी संस्था, लायन्स क्लब, रोटरी क्लब, नगरपरिषद यांना सामावून घेतले जाईल. 'सामाजिक कृतज्ञता निधी संकलनाचा' मुख्य हेतू योजनेपाठीमागे आहे. तळेगाव जनरल हॉस्पिटलचे व्यवस्थापक व या योजनेत भाग घेत असलेल्या विविध संस्थांचे प्रमुख 'कृष्णराव' यांच्या भावनांचा आदर करुन योजनेला आकार देण्याचा निर्णय घेतला आहे.

■ ■ ■

बातमी तुमची-आमची
मावळ ONLINE

# एक ध्येयवादी प्रवास

## कृष्णराव भेगडे यांचे जीवनदर्शन

(पान 2 वरुन)

झाला. विधानसभेत ते नियमितपणे प्रश्न मांडत. पवना धरणाचे पाणी शेतीसाठी मिळावे, मावळातील रस्त्यांचे डांबरीकरण, महादेव कोळी समाजासाठी आश्रमशाळा, लोणावळ्यात आयटीआय अशा अनेक योजना त्यांच्या पाठपुराव्यामुळे प्रत्यक्षात आल्या.

### शरद पवार यांच्याशी मैत्री आणि काँग्रेसमध्ये प्रवेश

याच काळात श्री. शरद पवार यांच्याशी त्यांचे वैचारिक मैत्रीचं नातं दृढ झालं. विरोधी पक्षात असूनही, शरद पवार त्यांच्या कामाला साथ देत. दोघांचाही समाजभानावर विश्वास होता. शरद पवार हे सहकारातील यशवंतराव चव्हाणांचे शिष्य, आणि कृष्णराव यांना हा मार्ग भावलेला. शरदरावांचा आग्रह होता – "कृष्णराव, तुम्ही राष्ट्रीय प्रवाहात या."

कृष्णरावांच्या मनात द्वंद्व सुरु होतं. एकीकडे जनसंघाने दिलेली संधी, संघाची शिकवण, मार्गदर्शक रामभाऊ म्हाळगी यांचे संस्कार; तर दुसरीकडे बहुजनसमाजाच्या व्यापक हितासाठी राष्ट्रीय प्रवाहात सामील होण्याची गरज. विचारविनिमय, आत्मपरीक्षण, कार्याची तुलना आणि सामाजिक परिणाम — या साऱ्यांचा विचार करून शेवटी त्यांनी निर्णय घेतला आणि १९७६ साली काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

### समाजासाठी झपाटून काम करणारा नेता

त्यांचा प्रवास केवळ राजकीय न राहता, सामाजिक परिवर्तनाचा होता. शिक्षण, सहकार, जलव्यवस्थापन, आदिवासी कल्याण, युवकांसाठी तांत्रिक शिक्षण आणि लोकसंपर्क यांच्या माध्यमातून त्यांनी मावळ परिसराला एक नवी दिशा दिली.

कृष्णराव भेगडे यांचे जीवन म्हणजे नेतृत्वाचे उत्कृष्ट उदाहरण. ते एक विचारवंत, सामाजिक कार्यकर्ता, सहकारी क्षेत्राचे प्रवर्तक आणि जनतेच्या मनात घर केलेले लोकप्रतिनिधी होते. त्यांच्या कार्याचा प्रभाव आजही मावळच्या मातीवर जाणवतो.

■■■

### पत्रकार आमदार होतो...

सामाजिक,सांस्कृतिक,आर्थिक, औद्योगिक,कृषी, कला, क्रीडा, साहित्य, संस्कृती अशा नानाविध क्षेत्रांमध्ये मुक्तपणे मुशाफिरी करणारे मा. आ.कृष्णराव भेगडे यांचे पत्रकार म्हणून असणारे योगदानही भरीव असे आहे. त्याबद्दल लोकांना फारसा परिचय नाही. दै. तरुण भारतचे पत्रकार म्हणून भेगडे साहेबांनी केलेले काम मोठे होते....



बातमी तुमची-आमची
मावळ ONLINE

# शिक्षण, समाज आणि संस्कारांचा दीपस्तंभ

## कै. कृष्णराव भेगडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**संतोष खांडगे**
(नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ, तळेगाव दाभाडे)



मावळ तालुक्याच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व औद्योगिक क्षेत्रात भरीव योगदान देणारे, हजारो जणांच्या जीवनात दीपस्तंभासारखे प्रकाश टाकणारे मावळभूषण, शिक्षणमहर्षी आणि माजी आमदार कै. कृष्णराव भेगडे (वय ८९) यांचे सोमवार, दि ३० जून २०२५ रोजी रात्री नऊ वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या जाण्याने मावळने एक खंबीर आधारवड गमावला आहे.

### शिक्षण म्हणजे समृद्धी, आणि 'माणूस घडवणं' म्हणजेच जीवनकार्य

कै. भेगडे साहेब हे फक्त राजकीय नेते नव्हते, तर मावळच्या शैक्षणिक पुनर्जागरणाचे शिल्पकार होते. "शिक्षण हेच खरे परिवर्तनाचे माध्यम" या तत्त्वावर ठाम राहून त्यांनी जीवनभर कार्य केले. अंधारात भरकटणाऱ्या पिढ्यांना उजेडाचा मार्ग त्यांनी दाखवला.

शिक्षण हाच समृद्धीचा खरा मंत्र आहे, अशी त्यांची भूमिका होती आणि त्यांनी हे तत्व आचरणात आणले.

### राजकारणात जनसेवेची शिकवण

जनसंघातून काँग्रेसमध्ये प्रवेश करून त्यांनी दोन वेळा विधानसभेचे, दोन वेळा विधानपरिषदेचे प्रतिनिधित्व केले. मात्र राजकारण त्यांच्या दृष्टीने सत्तेसाठी नव्हते, तर लोकसेवा व समाजकारणाचे माध्यम होते. प्रत्येक निर्णयात लोकहित आणि समाजविकास यांना प्राधान्य देणारा एक अजातशत्रू म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात असे.

### शैक्षणिक चळवळीचे एकात्म नेतृत्व

शिक्षण क्षेत्र हा त्यांच्या हृदयाजवळचा विषय. निवृत्तीनंतर त्यांनी स्वतःला पूर्णवेळ शैक्षणिक विकासासाठी झोकून दिलं. मावळातील घराघरात विद्येची शिदोरी पोहचवण्यासाठी त्यांनी घेतलेले प्रयत्न सिंहाचा वाटा ठरले.

नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळाच्या माध्यमातून त्यांनी शालेय, महाविद्यालयीन, तांत्रिक, अभियांत्रिकी, कौशल्यविकास यासारख्या सर्वच क्षेत्रात शिक्षणाचा झपाट्याने विकास केला. आज ही संस्था २० पेक्षा अधिक शैक्षणिक केंद्रे चालवते. 'एज्युकेशन' क्षेत्रातील नूतन ब्रँड आज संपूर्ण महाराष्ट्रात एक आदर्श ठरतो, याचे श्रेय कै. भेगडे साहेबांच्या दूरदृष्टीला जाते.

### दृष्टिकोन जागतिक – उपाय स्थानिक

त्यांनी नेहमी जागतिक दर्जाचं शिक्षण देण्यावर भर दिला, पण त्याचवेळी परिसरातील औद्योगिक गरजाही लक्षात घेतल्या. म्हणूनच त्यांनी कौशल्याधारित अभ्यासक्रमांची पायाभरणी केली.



स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा त्यांचा दृष्टिकोन हा काळाच्या पुढचा होता.

### सामाजिक समरसतेचा आदर्श

पक्ष, धर्म, जात यांच्या पलीकडे जाऊन त्यांनी समाजात समरसता निर्माण केली.

कै. मामासाहेब खांडगे, कै. बाळासाहेब बारमुख, कै. ड दादासाहेब परांजपे, कै. बाळासाहेब किबे,कै केशवराव वाडेकर, कै. दादासाहेब ढोरे, कै.वसंतदादा खांडगे,कै.अण्णासाहेब शेलार, कै. सुरेशभाई शहा, कै. मुकुंदराव खळदे, यांच्यासारख्या जाणत्या मंडळींना एकत्रित करून, शिक्षणाच्या क्षेत्रात क्रांती घडवली.

### संपूर्ण विकास हीच खरी लोकसेवा

त्यांच्यासाठी विकास म्हणजे केवळ रस्ते आणि पूल नव्हते.

त्यांचा दृष्टिकोन समतोल होता – शिक्षण, आरोग्य, सहकार, शेती, उद्योग, सामाजिक एकोपा – यांचा समन्वय साधत त्यांनी गावागावात शाळा, आरोग्य केंद्र, सहकारी संस्था आणि वस्तीगृहे निर्माण केली.

**"शिक्षण ही सेवा नाही, अधिकार आहे,"** हे त्यांनी कृतीतून दाखवून दिलं.



**एक विद्यापीठ संपलं... पण ज्ञानाचा उजेड अजूनही झगमगतो**

**"सत्तेत असूनही नम्रपणे सेवेत राहून निरलस, तुमचं कार्य हे अमर व अलौकिक खास।**

**जन्म झाला समाजासाठी, झिजलात तुम्ही लोककल्याणासाठी,**

**तुम्ही आमचे नेते नव्हे, तर होता आमचा आधार, प्रेरणा आणि आराध्य वडीलधारा।"**

### कार्यकर्त्यांचा शिस्तप्रिय मार्गदर्शक

त्यांचे व्यक्तिमत्व शांत, संयमी, पण ठाम होतं. शिस्त, सत्यता आणि निःस्वार्थ जनसेवा या मूल्यांची शिकवण त्यांनी कार्यकर्त्यांना दिली.

सत्तेत असूनही नम्रपणे सेवेत राहण्याची कला त्यांनी शिकवली.

### आज मावळ अश्रूंनी डोळे भरून उभा आहे...

कै. भेगडे साहेबांचं आयुष्य हे एक विद्यापीठ होतं – ज्यातून प्रत्येक पिढीला शिकायला मिळालं.

त्यांनी दिलेली शिकवण, विचार, मूल्यं आणि दृष्टिकोन – हीच त्यांना खरी आदरांजली.

**"शिक्षणमहर्षी", "मावळ भूषण", आणि ध्येयवेड्या नेतृत्वास...**

**भावपूर्ण श्रद्धांजली...**

■ ■ ■

बातमी तुमची-आमची
मावळ ONLINE



# मावळचा युगपुरुष

साठचे दशक हे महाराष्ट्रासाठी एक महत्त्वाचे दशक होते. राज्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी एक मजबूत पाया घातला गेला तो याच दशकात. मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र झाला आणि समाजकारण, राजकारण, अर्थकारण, कृषी, उद्योग, शिक्षण, साहित्य, कला, संस्कृती आदी क्षेत्रांच्या भक्कम विकासाची वाटचाल सुरु झाली. लोकनेते यशवंतराव चव्हाण यांच्या पथदर्शी नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या प्रत्येक भूभागात त्या त्या नेत्यांनी नेतृत्वाची आणि प्रगतीची किमया साधली. त्यातील एक महत्त्वाचे नेते म्हणजे मावळभूषण कृष्णराव भेगडे होय.

आदरणीय रामभाऊ म्हाळगी यांच्या मार्गदर्शनाखाली भेगडे साहेबांची राजकीय वाटचाल मावळ मतदारसंघातून सुरु झाली. संघाचे तृतीय वर्ष शिक्षित कृष्णराव भेगडे लोकसेवेने झपाटून गेलेले व्यक्तिमत्व होते. दांडगा जनसंपर्क आणि सारासार विवेकातून त्यांनी मावळ तालुक्याचे नेतृत्व केले. १९६१ साली नगरसेवक पदापासून त्यांनी आपल्या लोकसेवेच्या कार्याला सुरुवात केली ते आपल्या अखेरच्या श्वासापर्यंत त्यासाठी कटिबद्ध आणि बांधील राहिले.

कृष्णराव भेगडे यांच्या रुपात १९७२ साली मावळातील जनतेचा बुलंद आवाज विधानसभेत पोहोचला होता. जनसंघाच्या पाठबळावर ते पहिल्यांदा आमदार झाले. रामभाऊ म्हाळगी हे त्यांचे राजकीय गुरु म्हणता येतील. तत्कालीन राजकीय क्षेत्रामध्ये ' पुण्यात राम आणि मावळात कृष्ण' या घोषणेने खूप जोर धरला होता. लोकांमध्ये मिसळून लोकांचेच झालेले कृष्णराव भेगडे लोकांच्याच पाठिंबावर लोकनेते झाले होते. प्रश्नांची जाण असलेल्या, तरुण तडफदार आणि उत्तम नेतृत्व क्षमता असलेल्या कृष्णराव भेगडे यांचा चेहरा यशवंतराव चव्हाणांच्या नजरेतून सुटला नाही. १९७६ साली लोकनेते यशवंतराव चव्हाण यांच्या उपस्थितीत त्यांनी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला आणि चव्हाण साहेबांच्या विचारांची कास धरून आपली राजकीय वाटचाल पुनर्स्थापित केली.

**नंदकुमार अण्णासाहेब शेलार**
(सहसचिव, नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ, तळेगाव दाभाडे)

कृष्णराव भेगडे यांच्या जीवनकार्याचा राजकीय आणि सामाजिक अंगाने विचार केल्यास त्यांची प्रतिमा एक समग्र विकास पुरुष म्हणून समोर येते. राजकारण आणि समाजकारण या दोन्ही गोष्टींचा सुवर्णमध्य साधून लोकसेवेला समर्पित आयुष्य जगलेले कृष्णराव भेगडे अखेरच्या श्वासा पर्यंत मावळ वासियांचे लोकनेते होते. आधी समाजकारण नंतर राजकारण करीत जनसेवा, लोकसेवा आणि राजकारणाचा एक सुसंस्कृत वस्तूपाठ घालून देणारे कृष्णराव भेगडे हे मावळ तालुक्याचे विकास पुरुष होते.जनतेने एकमताने ठरवून लोकप्रतिनिधी म्हणून विधानसभेत पाठवलेले लोकप्रिय आमदार अशी कृष्णराव भेगडे यांची ख्याती होती.

आपल्या आमदारकीच्या काळात पवना धरणाच्या पाणी वाटपाचा प्रश्न, मावळ तालुक्यातील रस्त्यांचे जाळे,आंदर मावळातील दुर्गम भागात आश्रम शाळांची उभारणी, लोणावळ्यात तंत्र शिक्षण देणाऱ्या आयटीआयची उभारणी, कमाल जमीन धारणा कायद्यातून तळेगाव दाभाडे ला विशेष सवलत, आदिवासींच्या जमिनीसाठीचा लढा, मावळ तालुक्यात वैद्यकीय सेवांचा विस्तार, संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याची उभारणी आणि तळेगाव एमआयडीसीची उभारणी अशा नानाविध प्रश्नांना अग्रक्रमाने सोडवून त्यांनी मावळ तालुक्याला जगाच्या नकाशावर आणले. इथला भूमिपुत्र सक्षम झाला पाहिजे, त्याला हक्काचा घास मिळाला पाहिजे म्हणून कृष्णराव भेगडे आयुष्यभर झगडत राहिले. कृष्णराव भेगडे यांच्या आयुष्यातील दोन घटना अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. १९९३ च्या बॉम्बस्फोट प्रकरणानंतर शरद पवारांसाठी आपल्या आमदारकीचा राजीनामा देऊन शरद पवारांना मुख्यमंत्रीपदाचा मार्ग सुकर करून देणारे नेते म्हणून कृष्णराव भेगडे उभ्या महाराष्ट्राने पाहिले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट साठी भेगडे साहेब आणि माझे वडील कै. अण्णासाहेब शेलार यांच्या मालकीची २६ एकर शेतजमीन विना मोबदला देऊन मोठ्या शैक्षणिक कामासाठी त्यांनी त्याग आणि बलिदानाचा नवा आदर्श समाजापुढे घालून दिला. ट्रस्टने नंतर त्यांची जमीन पुन्हा त्यांना दिली खरी परंतु पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या शैक्षणिक कार्याचा तो मोठा श्रीगणेशा ठरला. शिक्षणासाठी त्याग आणि बलिदानाचा एक आगळावेगळा आदर्श घालून देणारे ते युगपुरुष ठरतात. या दोन घटनांमधून कृष्णराव भेगडे यांच्यातील निखळ लोकसेवकाचे दर्शन महाराष्ट्राला घडले.

'भेदाभेद भ्रम अमंगळ' या तुकोबारायांच्या उक्तीप्रमाणे जात-पात, धर्म-पक्ष, या लौकिक भेदांच्या पलीकडे कृष्णराव भेगडे पोहोचले होते. मावळभूषण कै. मामासाहेब खांडगे यांचे मानसपुत्र म्हणून कृष्णराव भेगडे यांची वैचारिक जडणघडणही उत्तम झाली. मावळ तालुक्याचा सर्वांगीण विकास साधत असताना सर्वपक्षीय नेत्यांना एका वैचारिक चौकटीमध्ये सांधून ठेवण्याचे कसब कृष्णराव भेगडे यांनी साधले होते.

कै.बाळासाहेब बारमुख, कै. दादासाहेब परांजपे, कै. बाळासाहेब किबे, कै. केशवराव वाडेकर, कै. दादासाहेब ढोरे, कै. वसंतदादा खांडगे, कै. अण्णासाहेब शेलार, कै. सुरेशभाई शहा, कै. मुकुंदराव खळदे यांसारख्या जाणत्या आणि आपल्या क्षेत्रात नेतृत्व करणाऱ्या मंडळींना एकत्रित करून मावळ तालुक्याच्या उद्योग, शिक्षण, आरोग्य, सहकार आदी क्षेत्रात प्रयत्नपूर्वक बळकटी आणण्याचे काम लोकप्रतिनिधी म्हणून कृष्णराव भेगडे यांनी केले.

जनतेने अपार प्रेम दिलेल्या कृष्णराव भेगडे यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीचे सोने केले. जनतेनेही तितकेच प्रेम त्यांच्यावर केले. लोकप्रतिनिधी आणि जनता यांच्या बांधिलकीचे उत्तम उदाहरण महाराष्ट्राने मावळ तालुक्यात अनुभवले. दोनदा विधानसभा आणि दोनदा विधान परिषद सदस्य म्हणून कृष्णराव भेगडे यांनी लोकशाहीच्या दोन्ही सभागृहांमध्ये जनतेच्या प्रश्नांना सर्वथनि न्याय दिला.

राजकारण हे वैयक्तिक स्वार्थासाठी न करता लोकसेवेचे पुण्य आपल्या खात्यात जमा करीत लोकसेवा करणारे कृष्णराव भेगडे समाज पंढरीचे वारकरी ठरतात. तुकाराम महाराजांच्या उक्ती प्रमाणे

'फोडिले भांडार धन्याचा तो माल, मी तो हमाल भारवाही' अथवा माऊली ज्ञानेश्वर महाराजांच्या उक्ती प्रमाणे ' आणिक जे उरले पाईकपण' या सेवक म्हणून राहिलेल्या कर्तव्य भावना आयुष्यभर आपल्या कार्यकर्तृत्वातून जगत आलेले कृष्णराव भेगडे रूढ अर्थाने आपल्यात नाहीत. परंतु त्यांनी घातलेली वैचारिक पायाभरणी, त्यांनी दिलेली संयमी राजकीय दिशा, लोकसेवेची प्रामाणिक चौकट यातून त्यांचे कार्य मावळवासीयांच्या मनात 'यावचंद्र दिवाकरो' राहील. कृष्णराव भेगडे त्यांच्या कृतिशील विचारातून कायम अमर राहतील यात शंका नाही.

**|| नामा म्हणे आत लोपला दिनकर,**
**बाप ज्ञानदेव समाधिस्त ||**

■ ■ ■



बातमी तुमची-आमची
मावळ ONLINE

# तो राजहंस एक...




शिक्षणातून रोजगाराच्या संधी निर्माण करता येतात. समाजामध्ये वैचारीक परिवर्तन घडविण्याची ताकद फक्त शिक्षण व्यवस्थेमध्ये आहे ही धारणा ठेवून मावळ तालुक्याच्या शैक्षणिक विकासाचे कर्मयोगी म्हणून भेगडे साहेबांची प्रतिमा आणखीनच उदात्त होते. एक शिक्षक म्हणून आपल्या जीवन कार्याची सुरुवात करणारे कृष्णराव भेगडे हे मावळ तालुक्यासाठीच नव्हे तर महाराष्ट्राच्या राजकीय पटावर एक आधारवड असलेले नेते ठरले. शैक्षणिक,सामाजिक,राजकीय, उद्योग, क्रीडा,सांस्कृतिक, क्षेत्रात त्यांनी आपल्या कृतिशील कार्याचा एक वेगळा ठसा उमटविला.

शिक्षण क्षेत्रामध्ये मावळ तालुका पुढे आला पाहिजे हे स्वप्न उराशी बाळगून साहेबांनी वेळोवेळी योग्य निर्णय घेऊन तालुक्याच्या शिक्षण व्यवस्थेला आकार दिला. त्याची दृश्य परिणामकारकता म्हणून तालुक्यात आज ६३ शैक्षणिक संकुले दिमाखात विद्यादानाचे कार्य करीत आहेत.

इंद्रायणी विद्या मंदिर संस्थेच्या माध्यमातून केलेले कार्य अफाट आहे. १९६५ मध्ये इंद्रायणी विद्या मंदिर संस्थेची स्थापना झाली. तळेगाव जनरल हॉस्पिटल च्या टीबी वार्ड शेजारी ४४ विद्यार्थ्यांवर महाविद्यालयाची सुरुवात झाली. हळूहळू शैक्षणिक प्रगती व्हायला सुरुवात झाली. मात्र मध्येच संस्थेला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला.

**डॉ संभाजी मलघे**
(प्राचार्य, इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे)

त्यावेळी भेगडे साहेबांनी घेतलेले सर्वच निर्णय किती योग्य होते याची प्रचिती आज सर्वांनाच आहे. माजी शिक्षणमंत्री, खासदार असलेल्या रामकृष्ण मोरे यांना संस्थेचे अध्यक्ष बनवून मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मोठा निधी इंद्रायणी विद्या मंदिर संस्थेसाठी उभा करून संस्थेचे आर्थिक ग्रहण साहेबांनी दूर केले. साहेबांच्या या पथदर्शी निर्णयामुळे संस्थेचे आज विशाल वटवृक्षात रुपांतर झाले आहे.



राष्ट्रीय शिक्षणाची बीजे तळेगाव नगरीत रुजली. कै.लोकमान्य टिळक आणि कै.अण्णासाहेब विजापूरकर यांनी सुरु केलेल्या नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळाचे दीर्घकाळ अध्यक्ष म्हणून भेगडे साहेबांची शैक्षणिक कारकीर्द महत्त्वाची ठरते. आज नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळाच्या आणि इंद्रायणी विद्यामंदिर संस्थेच्या विस्तीर्ण शैक्षणिक संकुलातून बाहेर पडलेल्या हजारो विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्याला आकार दिला.

साहेबांची राजकीय कारकीर्द तत्त्वाधीष्टित विचारांवर आधारभूत होती. समाजकारण आणि राजकारण या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून त्याचा सुवर्णमध्य साधण्यास समाजाचे हित साधले जाऊ शकते हे गमक त्यांना समजले होते. म्हणूनच लोकांनी निस्सिम प्रेम केलेले ते लोकनेते ठरले. त्यांच्या पराभवानंतर तळेगावात चुलही पेटू नये यातून त्यांची लोकप्रियता लक्षात येते.

आरोग्य, उद्योग, शेती, शिक्षण, समाज आदी विषयांची सखोल जाण असलेले नेते म्हणून भेगडे साहेबांचे कार्य कालातीत आहे. चाकण, तळेगाव एमआयडीसी उभारण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. मुंबई पुणे द्रुतगती महामार्गाची निर्मिती, मावळ तालुक्यातील दळणवळणाच्या सोयी सुविधा, टाकवे येथील औद्योगिक वसाहत, आदिवासींसाठी दिलेला लढा अशा कितीतरी कामांमधून भेगडे साहेब अजरामर झाले.

आपल्या महाविद्यालयीन जीवनात अर्थशास्त्र व समाजशास्त्र हे विषय अभ्यासासाठी निवडले. समाजशास्त्राच्या अभ्यासामुळे समाजातील विविध घटकांचे परस्परसंबंध, त्यांचे प्रश्न आणि त्यावर उपाय शोधण्याची दिशा त्यांना मिळाली. पुढे वाडिया महाविद्यालयातून बी.ए. ऑनर्स पदवी संपादन केली.

तत्कालीन समाज व्यवस्थेमध्ये बहुजन समाजातील विद्यार्थ्यांपैकी शिक्षण घेऊन नेतृत्व करणाऱ्यांची संख्या खूप कमी होती. त्यामुळे साहेबांना बी.ए. ऑनर्स ही पदवी मिळणे हे त्यांच्यासाठी फक्त शिक्षणातील यश नव्हते, तर समाजात त्यांच्यासारख्या अनेक इतरांसाठी नवा आदर्श निर्माण करण्याचे साधन होते. पदवी मिळाल्यानंतर त्यांनी सहकार खात्यात नोकरी स्वीकारली. मंचर येथे शिक्षक म्हणूनही काम केले. तसेच एका खासगी संस्थेतही त्यांनी काही काळ सेवा दिली. मात्र या नोकऱ्यामधे त्यांना कधीही स्वारस्य असे वाटले नाही. समाजकार्याची ओढ त्यांना कायम खुणावत आली. आणि मग सहाजिकच ते राजकारणाकडे ओढले गेले.

जनसंघ ते काँग्रेस पुढे राष्ट्रवादी काँग्रेस असा राजकीय उंचावणारा आलेख भेगडे साहेबांनी बघितला. उत्तम लोकप्रतिनिधी, फर्डा वक्ता, उत्तम माणूस अशा कितीतरी आयमानी सजलेले त्यांचे व्यक्तिमत्व मावळ तालुक्यातील जनतेने अनुभवले. हार पराजयाच्या पलीकडे असलेल्या राजकारणाचे दर्शन त्यांनी आपल्या वर्तनातून घडविले. त्यांनी पत्रावळ्या उचलणारे कार्यकर्ते तयार केले नाहीत. तर आयुष्यात आपल्या पायावर भक्कमपणे उभे राहणारे माणसांचे इमले तयार केले.

■ ■ ■



बातमी तुमची-आमची
मावळ ONLINE



# असामान्य लोकनेता

समर्थ रामदास स्वामी म्हणतात की, 'सामर्थ्य आहे चळवळीचे जो जो करील तयाचे' याप्रमाणेच मावळ मातीचे भूमिपुत्र मावळभूषण माजी आमदार कृष्णराव भेगडे यांचे संपूर्ण जीवन चरित्र बघितल्यास ती एक लोकचळवळ होती असे म्हणता येईल. आयुष्याच्या शेवटपर्यंत लोकसेवेचा ध्यास घेतलेले राजकीय नेते या महाराष्ट्राने बघितले त्यातील कृष्णराव भेगडे हे महत्त्वाचे नाव. जनसंघ, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस अशी राजकीय वाटचाल राहून सुसंस्कृत राजकारणाचा आदर्श वस्तूपाठ निर्माण करणारे कृष्णराव भेगडे हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक महत्त्वाचे राजकीय नेते ठरले.

राजकारण हे वैयक्तिक स्वार्थासाठी न करता त्यातून समाजकारणाचा मोठा आदर्श त्यांनी आपल्या कर्तृत्वाने सिद्ध केला. खरंतर कृष्णराव आमदार झाले त्याकाळी सोयी सुविधांचा अभाव नक्कीच होता. त्या काळात मावळातील गाव आणि गाव पायी किंवा बैलगाडीत फिरून कृष्णराव भेगडे यांनी आपला लोक संपर्क वाढवला. फक्त कार्यकर्तेच तयार केले नाहीत तर आपला मतदारसंघ आपले कुटुंब बनविले. या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीच्या सुख दुःखामध्ये भेगडे साहेब कायम सहभागी असायचे.

पुरोगामी महाराष्ट्राचे शिल्पकार महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी कृष्णराव भेगडे यांच्यातील नेतृत्व गुण वेळीच ओळखले होते. त्यांना आपल्याकडे वळवून यशवंतराव चव्हाण यांनी कृष्णरावांच्या राजकीय आयुष्याला वैचारिक दिशा दिली. हाच आदर्श कृष्णरावांनी मावळ भूमीत रुजवला. कृष्णरावांनी सत्तेचे आणि पैशाचे राजकारण कधीच केले नाही.

**चंद्रकांत शेटे**
(कार्यवाह, इंद्रायणी विद्यामंदिर संस्था, तळेगाव दाभाडे)

त्यांनी इथल्या गाव मातीचे समाजकारण केले. या भूमीतला माणूस त्यांनी उभा केला. त्याला नोकरी पाण्याला मदत केली. मावळ तालुक्यातील कितीतरी कुटुंबे आज सुखाने आपल्या आयुष्यात जगत आहेत याचे सर्व श्रेय भेगडे साहेब यांना जाते.

जात धर्म पंथ या लौकिक भेदांच्या पलिकडे जाऊन समग्र समाजाच्या पुनर्मांडणीसाठी भेगडे साहेबांनी मावळभूषण कै.मामासाहेब खांडगे, कै. बाळासाहेब बारमुख, कै.दादासाहेब परांजपे, कै.बाळासाहेब किबे, कै.केशवराव वाडेकर, कै.दादासाहेव ढोरे, कै.वसंतदादा खांडगे, कै.अण्णासाहेब शेलार, कै. सुरेशभाई शहा, कै.मुकुंदराव खळदे, यांच्यासारख्या जाणत्या आणि आपापल्या पातळीवर विविध क्षेत्रांमध्ये नेतृत्व करणाऱ्या मंडळींना एकत्रित करून मावळ तालुक्याच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात विचारांचा आणि न्यायाचा एकोपा साधला.

२००५ नंतर मावळात उद्योग व्यवसायाची घडी बसायला सुरुवात झाली. या दृष्टीने मावळातील प्रत्येक माणसाला याचा फायदा व्हावा म्हणून कृष्णराव भेगडे यांनी आटोकाट प्रयत्न केले. इथल्या भूमिपुत्राला हक्काचा घास त्यांनी मिळवून दिला. कुटुंब उभी राहिली.

राजकारण आणि समाजकारण करताना कृष्णराव भेगडे यांनी आपले आयुष्य समाजासाठी वेचले. कृष्णराव भेगडे आज सत्तेत नाहीत मात्र, आजही त्यांचा शब्द मावळ तालुक्याच्या विकासात अंतिम मानला जातो.

एखाद्या लोकनेत्यावर तालुक्यातील जनतेने किती प्रेम करावे याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे मावळ भूषण कृष्णराव भेगडे होय. विधानसभा आणि विधानपरिषदेवर त्यांना मिळालेल्या राजकीय संधीचे त्यांनी सोने केले. कृष्णराव भेगडे कायम आपल्या विचारांशी प्रामाणिक राहिले. त्यांनी दूरदृष्टी दिलेल्या मावळ तालुक्यातील अनेक शिक्षण संस्थांनी या तालुक्याला मोठे ज्ञान भंडार दिले. याचे उत्तम उदाहरण म्हणजे नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ आणि इंद्रायणी विद्या मंदिर संस्था होय. या दोन्ही संस्था आज शैक्षणिक प्रगतीचे शिखरावर पोहोचले आहेत याचे सारे श्रेय आदरणीय भेगडे साहेब यांना जाते.

जनसंघाचे नेते रामभाऊ म्हाळगी यांच्या विचारधारेने प्रेरित होऊन कृष्णराव भेगडे यांनी आपला राजकीय श्रीगणेशा केला. त्यानंतर दोनदा विधानसभा सदस्य आणि दोनदा विधानपरिषद सदस्य होऊन त्यांनी मावळ तालुक्याचे नेतृत्व केले.

टाकवे येथे इंद्रायणी औद्योगिक वसाहतीच्या निर्मितीमध्ये त्यांचे मोठे योगदान आहे. मावळ तालुक्याचा चेहरामोहरा बदलायला सुरुवात झाली. मोठ्या प्रमाणावर रोजगार उभे राहिले, त्यातून अनेक कुटुंबांना हक्काचा निवारा मिळाला. भेगडे यांनी जनसेवेचा ध्यास, कामाचा उरक आणि आवाका या जोरावर मोठे समाजकार्य उभे केले. कोणताही वैयक्तिक स्वार्थ समोर न ठेवता ते कायम निस्वार्थी जनसेवक म्हणून जगले.

■ ■ ■





बातमी तुमची-आमची
मावळ ONLINE

# ॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥







## कै. मा. श्री. कृष्णरावजी धोंडीबा भेगडे साहेब

नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष, पुणे जिल्ह्याचे नेते, मावळचे माजी आमदार, शिक्षणमहर्षी, मावळभूषण कै. मा. श्री. कृष्णराव धोंडीबा भेगडे वय (८९) यांचे सोमवार दि. ३० जून २०२५ रोजी दु:खद निधन झाले. ईश्वर सत्तेपूढे इलाज नाही.
**परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो ही ईश्वरचरणी प्रार्थना.**

### दशक्रिया विधी (माळेचा कार्यक्रम)

बुधवार, दि. ९ जुलै २०२५ रोजी सकाळी ९ वा. श्री बनेश्वर दशक्रिया विधी भूमी तळेगाव दाभाडे, ता. मावळ येथे संपन्न होणार आहे.

### प्रवचन सेवा

**ह. भ. प. गणेश महाराज भगत**
संस्थापक जगद्‌गुरू तुकोबाराय कीर्तन विश्व विद्यालय गुरुकुल, पुणे

### शोकाकुल

नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ, तळेगाव दाभाडे, विष्णूपूरी,
समर्थ संकुल, तळेगाव दाभाडे (स्टेशन), ता. मावळ, जि. पूणे - ४१० ५०७
फोन नं. ०२११४ - २२८१७५